मंगळवार, दि. ३० सप्टेंबर २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ४३ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 | yuva.aadarsh@gmail.com | 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ | https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ | https://twitter.com/Yuva_aadarshjln/ | RNI: MAHMAR/2019/78282

# कायदा स्पष्ट; पण अंमलबजावणी गायब?

## गुटखा बंदीचा हा खेळ किती दिवस?

**दीपक शेळके**

**जालना -** जिल्ह्यात गुटखा बंदी फक्त कागदावर आहे, प्रत्यक्षात मात्र लाल रंगाचा राजा सतिश उर्फ लाला खुलेआम गुटखा विकतोय. युवकांचे आरोग्य धोक्यात, समाजाची भविष्यातील पिढी विषारी पदार्थांच्या जाळ्यात फसलेली, तर प्रशासन मात्र मौनात बसले आहे. हा मौन म्हणजे गुटखा माफियास अभय नाही का?

गुटखा माफियाचा धंदा राज्याच्या प्रतिबंधित कायद्यांच्या भोवती फिरत चालला आहे. बीएनएससह औषधे अधिनियम सर्व स्पष्ट आहेत; शिक्षेसह तुरुंगवास तर ठरलेला आहे. मग प्रश्न असा - जर कायदा एवढा स्पष्ट आहे, तर गुटखा माफियावर कारवाई का होत नाही?

जळगावपासून जालना, छत्रपती संभाजीनगर आणि बुलढाणा हा महामार्ग गुटखा वाहतूकसाठी तयार केला गेला आहे का?. गाड्या भरून गुटखा तालुका पोलीस हद्दीत उतरतो, आणि पोलीस किंवा प्रशासनाला काही दिसत नाही. हा तथ्यात्मक फज्जा किती दिवस चालणार? एवढ्या मोठ्या




प्रमाणावर गाड्या धडधडीत फिरतात, आणि पोलिसांना काही कळत नाही? की जाणूनबुजून कानाडोळा केला जातो?

जालना जिल्ह्यात गुटखा बंदी हा शब्द फक्त कागदावर आहे. प्रत्यक्षात मात्र गुटखा माफिया सतिश उर्फ लाल रंगाचा राजा खुलेआम धंदा करतोय, आणि प्रशासन डोळ्यांवर पट्टी बांधून बसले आहे. युवकांचे आयुष्य उद्ध्वस्त होत आहे, तर अधिकारी मात्र गप्प आहेत. हा मौन म्हणजे अभय नाही का?

भारतीय न्याय संहितांर्गत गुटखा विक्री, साठा, वाहतूक हा थेट गुन्हा आहे. FSSI लीं आणि औषधे व सौंदर्य प्रसाधने अधिनियमांतर्गत कारवाईची तरतूद आहे. शिक्षा, दंड, तुरुंगवास सर्वकाही ठरलेले आहे.

मग प्रश्न असा आहे की, जर कायदा एवढा स्पष्ट आहे, तर लाल रंगाच्या राजावर कारवाई होत का नाही?

जिल्ह्यात गुटखा बंदीची अंमलबजावणी न करणे म्हणजे प्रशासनिक अपयश आहे. गुप्त माहिती, नाकाबंदी, छापे कुठे गेले? नमुने घेणे, परवाने रद्द करणे कुठे गेले?

जर अधिकारीच हात झटकून बसले, तर मग हा धंदा राजरोस चालणारच.

गुटख्यातील निकोटिन, मॅग्नेशियम कार्बोनेट थेट कॅन्सरला आमंत्रण देतात. युवकांचे दात, हाडे, फुफ्फुसे, संपूर्ण शरीर हळूहळू नाश पावत आहे. प्रत्येक पाऊच म्हणजे एक मृत्यूची तिकिटं आहे.

प्रशासन युवकांचे आरोग्य वाचवणार की गुटखा माफियाचा धंदा?

**जालनेकरांचे काही प्रश्न आहेत**

लाल रंगाच्या राजाला संरक्षण देणारे कोण?

जिल्हाधिकारी व पोलीस अधिक्षक यांनी आतापर्यंत कोणती कारवाई केली?

गुटखा गाड्या पोलिसांच्या नाक्यावरून कशा सरळ जातात?

युवकांचे आयुष्य उद्ध्वस्त होण्याची जबाबदारी कोण घेणार?

गुटखा बंदी खरी आहे का, की ती केवळ दिखावा?

गुटखा माफियाला अभय देणारे कितीही मोठे असले तरी जनता मूक बसणार नाही.

लाल रंगाचा राजा थांबवला नाही, तर हा लाल रंग संपूर्ण समाजाला रक्तरंजित करेल.

जालना जिल्ह्यातील नागरिकांचा रोष उफाळला आहे आणि आता प्रशासनाला उत्तर द्यायलाच हवे.

## जिल्हा सरकारी रुग्णालयातील एमआरआय मशीन धुळखात

## तात्काळ कार्यान्वित करा अन्यथा रस्त्यावर उतरणार - अरविंद देशमुख

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हा सामान्य रुग्णालयासाठी तब्बल वर्षभरापूर्वी प्राप्त झालेले आधुनिक एमआरआय मशीन अजूनही कार्यान्वित झालेले नाही. लाखो रुपयांची ही यंत्रसामग्री धूळखात पडून राहिल्यामुळे गोरगरिबांना प्रचंड मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागत आहे. गरीब रुग्णांना खाजगी रुग्णालयात ही महागडी चाचणी करून घ्यावी लागते. ही मशीन तात्काळ सुरू करावी; अन्यथा रुग्णहितासाठी महासंघ रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडेल, असा खणखणीत इशारा जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख यांनी दिला आहे.



यासंदर्भात प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात अरविंद देशमुख यांनी म्हटले आहे की आज अनेक आजाराच्या निदानासाठी एमआरआय अत्यावश्यक आहे. खाजगी रुग्णालयांमध्ये त्यासाठी ६ ते ८ हजार रुपये आकारले जातात. हे शुल्क गोरगरिबांच्या आवाक्याबाहेर आहे. त्यामुळे शासकीय रुग्णालयात मोफत सुविधा उपलब्ध व्हावी म्हणून हे मशीन प्राप्त झालेले आहे. एक वर्ष उलटून गेले तरी ते कार्यान्वित करण्यात आलेले नाही. हा रुग्णांच्या जीवाशी केलेला पान २ वर

युवा आदर्श

### खेळ ...

**नभा इतक्या अपेक्षा**
**सतत जयकार सर्वत्र**
**गाजले संपूर्ण विश्वात**
**विजयी मालिका सत्र**
**झंझावाती संघ सार्थ**
**चषकां परोपरी पात्र**
**सर्वांची अशी भावना**
**प्रतिस्पर्धी किंवा मित्र**
**यशोगाथा हवीभारता**
**खुणाविते मैदान क्षेत्र**
**विजय नोंदवला सतत**
**आगळेचं यंदाला सत्र**
**जिंकणे हरणे गौणतम**
**प्रयत्न असे अतिपवित्र**
**पराजीताचे अभिनंदन**
**तिथेचं जागृत सुचरित्र**
**आशिया चषक जिंके**
**शहारून गेले गात्रगात्र**
**दिवाळी आधी साजरी**
**लखलख विजयी रात्र**
**उत्कंठा वर्धक सामना**
**पाहिला उत्साहे एकत्र**
**भारत माता की जय**
**डंका वाजविला सर्वत्र**

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

**झाडे लावा**
**झाडे जगवा**

# मराठी भाषेवर कुठलेही अतिक्रमण होणार नाही यासाठी सजग राहण्याचे आव्हान - कौतिकराव ठाले पाटील

मराठी भाषेवर कुठलेही अतिक्रमण होणार नाही यासाठी सजग राहण्याचे आव्हान- कौतिकराव ठाले पाटील

जालना : येथे मराठवाडा साहित्य परिषदेचे ८२ वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील हे होते तर उद्घाटक म्हणून प्रसिद्ध कवी इंद्रजित भालेराव, विषेश सत्कारमुर्ती सौ. रेखाताई बैजल, तर प्रमुख उपस्थितीत प्रा. दादा गोरे, कार्यवाहक आसाराम लोमटे, रामचंद्र तिरुखे,उपाध्यक्ष, रामचंद्र काळुंखे, प्रा.गणेश मोहिते,प्रा.राम अग्रवाल,प्रा. गणेश अग्निहोत्री,सुभाष कोळकर,जालना शाखा मराठवाडा साहित्य परिषद अध्यक्ष रविंद्र तौर,बाळासाहेब तनपुरे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. प्रसिद्ध कवी इंद्रजित भालेराव यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करुन उद्घाटन करण्यात आले. मान्यवरांच्या सत्कारानंतर प्रसिद्ध लेखीका रेखा बैजल यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. याप्रसंगी अध्यक्षीय भाषणात कौतिकराव ठाले पाटील यांनी मराठी भाषा व साहित्य समृद्ध करण्यासाठी तसेच मराठी भाषा जिवंत ठेवण्यासाठी व मराठी भाषा राजभाषा असतांना इतर भाषेची सक्ती कशाला ? असा आक्रमक सवाल याप्रसंगी मांडून इतर भाषेला राज्यात विरोध करणे आवश्यक असल्याचे सांगितले.व मराठी भाषा टिकवण्यासाठी सजग राहण्याचे आव्हान स्विकारावे लागेल असे सांगितले.मराठवाड्याने अनेक नामवंत साहित्यिक महाराष्ट्राला दिले. सर्वाधिक पारतंत्र्यात राहिलेला मराठवाडा साहित्य क्षेत्रात आघाडीवर असल्याचे गौरवोद्गार त्यांनी याप्रसंगी काढले! मसाप च्या कार्याचा आढावा घेतला व पुढील काळात या संस्थेचे कार्य पुढे नेण्यासाठी तरुणांनी पुढे यावे यासाठी आवाहन केले. जालना शाखा अध्यक्ष रविंद्र तौर यांनी प्रास्ताविक करताना जिल्ह्यातील मराठी साहित्यकांच्या अपेक्षा पूर्ण करण्याची जबाबदारी घेऊन मसाप चे सर्व कार्यक्रम यशस्वीपणे राबवण्याची ग्वाही दिली. याप्रसंगी जालना शाखे मार्फत होणार्या विविध उपक्रमाची माहीती दिली. प्रमुख अतिथी प्रसिद्ध कवी इंद्रजीत भालेराव बोलताना म्हणाले की मराठवाड्यातील मसाप ही मातृसंस्था असून पर्याय म्हणून अनेक संस्था या ठिकाणी उभा



राहिल्या परंतु त्या टिकल्या नाहीत शुद्ध हेतूने काम करणारी मसाप सर्व समाज घटकांना घेऊन प्राचार्य कौतिकराव ढाले पाटील यांच्या नेतृत्वाखाली खूप चांगल्या पद्धतीने काम करीत आहे मसाप कडून समाजाला मोठ्या अपेक्षा आहेत असे सांगीतले. दादासाहेब गोरे यांनी आपल्या भाषणात म्हणाले की जालना शाखेचे काम उत्तम असून आपल्या कार्य कक्षा वाढवल्या पाहिजेत नवोदित साहित्यिकांना प्रोत्साहन देणारे कार्यक्रम आयोजित केले पाहिजेत.असे आवाहन प्रसिद्ध लेखिका रेखा बैजल यांनी सत्कारानंतर भाष्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा. रंगनाथ खेडेकर तर केंद्रीय सदस्य सुभाष कोळकर यांनी आभार मानले.

दुपारच्या सत्रात जेष्ठ कवी राम गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली व डॉ. प्रा.ज्योती धर्माधिकारी यांच्या सूत्र संचलनाने कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी पान २ वर

## उद्योजकांसाठी मोफत प्रशिक्षण कार्यक्रम; नाव नोंदणीचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** रोटरी क्लब ऑफ जालनातर्फे महाराष्ट्र शासन व झेप उद्योगिनी महिला उद्योजक गटाच्या सहकार्याने उद्योजकांसाठी मोफत प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात झेप संस्थेच्या प्रमुख सौ. पोर्णिमा शिरसीकर यांचे मार्गदर्शन लाभणार असून, सहभागी महिलांना शासनमान्य प्रमाणपत्र, उद्योग प्रशिक्षण तसेच स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी आवश्यक आर्थिक पाठबळ उपलब्ध करून दिले जाणार आहे.

या संदर्भात अधिक माहिती देताना रोटरी क्लबच्या अध्यक्षा सौ. वर्षा पित्ती यांनी सांगितले की, हा प्रशिक्षण कार्यक्रम सरकारी मान्यताप्राप्त असून, सहभागींना मिळणाऱ्या अधिकृत प्रमाणपत्रामुळे उद्योजकांची विश्वासार्हता वाढेल आणि व्यवसायातील संधी अधिक विस्तारतील.या प्रशिक्षणात विशेषतः भारत सरकारच्या एमएसएमई योजना व अनुदाने, डिजिटल मार्केटिंग व ई-कॉमर्स धोरणे, गव्हर्मेंट ई मार्केट मार्फत विपणन,आर्थिक साक्षरता व व्यवसाय नियोजन,कौशल्य विकास मॉड्यूल्स, शाश्वतता आणि महिला उद्योजकता या विषयावर मार्गदर्शन पान २ वर

# एकरी किमान तीस हजार द्या; अन्यथा आंदोलन

## शेतकऱ्यांसाठी मदतीची मनसेची ठाम मागणी

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यासह राज्यातील शेतकरी समाजावर पुन्हा एकदा अन्यायाचा डोंगर कोसळला आहे. यावर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले असून, राज्य सरकारकडून ठोस मदतीची घोषणा न झाल्याने शेतकरी संतप्त झाले आहेत. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने (मनसे) ठाम भूमिका घेतली असून, पंजाब सरकारने शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये मदत केली, तर महाराष्ट्र सरकारने किमान एकरी ३० हजार मदत करावी, अशी मागणी केली आहे.

**पिकविम्यातील गोंधळ आणि शेतकऱ्यांची हतबलता**

मनसेने सरकारवर तीव्र टीका करताना सांगितले की, गेल्या काही वर्षांपासून पिकविमा योजनेत सतत निकष बदलले जात आहेत. त्यामुळे यावर्षी तब्बल ७० टक्के शेतकऱ्यांनी पिकविमा भरलेलाच नाही. याउलट २०१९-२० मध्ये राबवलेल्या **'एक रुपया पिकविमा योजने'**ला प्रचंड प्रतिसाद मिळाला होता आणि ९० टक्क्यांहून अधिक शेतकऱ्यांनी पिकविमा घेतला होता. मग आज निकष बदलण्याची गरज काय, असा सवाल मनसेने केला आहे.

**शेतकरी अस्वस्थ, सरकार उदासीन**

मनसेने स्पष्ट केले की, विजेच्या बिलांचा प्रचंड बोजा, कृषी व जिल्हा परिषदेच्या योजनांचा अभाव, नॅशनल बँकेचे टोलवाटोलवीचे धोरण, आणि पिकविमा कंपन्यांची उदासीनता आहे. यामुळे शेतकऱ्यांचे आयुष्य दिवसेंदिवस कठीण झाले आहे. जगण्यापेक्षा मरण बरे अशी वेळ शेतकरी समाजावर ओढवली असून, प्रत्येक गावात शेतकरी संतप्त चर्चा करत आहेत.

**निवास व मूलभूत सुविधा अजूनही अपुऱ्या**

शेतीप्रधान देश असूनही शेतकऱ्यांना शेतात कांदा चाळ किंवा घरकुल (पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत) मिळालेले नाही. जर शेतकऱ्यांना शेतातच निवासी व्यवस्था उपलब्ध झाली, तर शेतीचा विकास होईल, परंतु राज्य सरकारच्या निष्काळजीपणामुळे हा प्रश्न अद्याप मार्गी लागलेला नाही, असे मनसेने ठणकावले.

**पंजाबचा आदर्श, महाराष्ट्रात उपेक्षा**

मनसेने निदर्शनास आणून दिले की, पंजाब सरकारने अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत जाहीर केली आहे.




महाराष्ट्रातील सरकार मात्र अद्याप मौन बाळगून आहे. यामुळे शेतकरी समाजात संतापाची लाट उसळली आहे.

**राज ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलनाची चेतावणी**

मनसेने स्पष्ट केले की, राज्य सरकारने तातडीने हेक्टरी ३० हजार मदत जाहीर केली नाही, तर शेतकरी अन्नत्याग आंदोलन सुरू करतील. गावोगावी चर्चा सुरू असून, लवकरच आंदोलन पेट घेण्याची चिन्हे आहेत. सरकारने हा प्रश्न गांभीर्याने घेतला नाही तर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली पान २ वर

# संपादकीय

## भारतच आशियाचा राजा

रविवारी दुबईत झालेल्या आशिया चषकाच्या अंतिम सामन्यात पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानचा ५ विकेट्सने धुव्वा उडवत भारताने आशिया चषकावर विक्रमी नवव्यांदा नाव कोरत इतिहास रचला. विशेष म्हणजे या स्पर्धेत भारताने पाकिस्तानचा सलग तीनदा पराभव करत हॅट्ट्रिक साजरी केली. रविवारी खेळल्या गेलेल्या अंतिम सामन्यात भारताच्या फिरकी गोलंदाजांनी त्यातही कुलदीप यादवने अप्रतिम गोलंदाजी करत पाकिस्तानच्या फलंदाजांची पळता भुई थोडी केली. कुलदीप यादवने अंतिम सामन्यात भेदक गोलंदाजी करताना अवघ्या ३० धावात ४ बळी मिळवले. विशेष म्हणजे त्याने आपल्या चौथ्या षटकात पाकिस्तानचे तीन फलंदाज बाद केले. त्याला वरुण चक्रवर्ती, अक्षर पटेल, जसप्रीत बुमरा यांनी चांगली साथ दिली. या तिघांनी प्रत्येकी २ बळी मिळवत श्रीलंकेला अवघ्या १४६ धावात रोखले. विशेष म्हणजे पाकिस्तानने त्यांच्या डावाची सुरुवात धमाकेदार केली. त्यांच्या सलामीच्या जोडीने धडाकेबाज सुरुवात करून भारतीय गोलंदाजांना चकित केले. ९ धावांच्या सरासरीने त्यांनी धावा काढल्या मात्र १ बाद ११३ अशा सुस्थितीतून त्यांची घसरगुंडी उडाली. वरुण चक्रवर्तीने दुसरा बळी मिळवल्यावर पाकिस्तानची गाडी रुळावरून घसरली. भारताच्या फिरकी गोलंदाजांनी आपल्या धारधार गोलंदाजिने पाकिस्तानच्या फलंदाजीचे कंबरडे मोडले. अवघ्या ३३ धावात भारताने पाकिस्तानचे ९ फलंदाज बाद केले. भारताच्या फिरकी गोलंदाजीपुढे पाकिस्तानची फलंदाजी पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे कोलमडली आणि पाकिस्तानचा संघ पूर्ण २० षटके देखील खेळू शकला नाही. १४७ धावांचे आव्हान घेऊन मैदानात उतरलेला भारतीय संघ किती षटकात विजय मिळवणार असाच प्रश्न विचारला जात होता मात्र पाकिस्तानच्या गोलंदाजांनी भारताचे पहिले तीन फलंदाज स्वस्तात बाद करून क्रिकेटप्रेमींची धाकधूक वाढवली मात्र भारताचा मधल्या फळीतील युवा फलंदाज तिलक वर्मा याने एक बाजू लावून धरत शानदार अर्धशतक झळकावले त्याला यष्टिरक्षक संजू सॅमसन आणि अष्टपैलू शिवम दुबेने चांगली साथ दिली. त्यामुळे भारताने सहज विजय मिळवला आणि १४५ कोटी देशवासीयांना विजयादशमीची गोड भेट दिली. भारतीय संघाने सर्वाधिक ९ वेळा आशिया चषकावर मोहोर उमटवत आपणच आशियाचा राजा आहोत हे सिद्ध केले. भारताने या स्पर्धेत अप्रतिम कामगिरी केली. गोलंदाजी, फलंदाजी आणि क्षेत्ररक्षण या तिन्ही आघाड्यांवर भारतीय खेळाडूंनी चांगली कामगिरी केली. भारताच्या सर्वच खेळाडूंनी चांगली कामगीरी करून आपण फॉर्मात असल्याचे दाखवून दिले. अभिषेक शर्मा, शुभमन गिल, तिलक वर्मा, हार्दिक पांड्या, संजू सॅमसन या भारताच्या सर्वच फलंदाजांनी अप्रतिम कामगिरी केली. सूर्यकुमार यादवने फलंदाजीत चमकदार कामगिरी केली नसली तरी त्याने संघाचे नेतृत्व कुशलतेने केले. गोलंदाजीतही बुमराह, कुलदीप यादव, वरुण चक्रवर्ती, अर्शदीप सिंग, हार्दिक पांड्या, अक्षर पटेल यांनी चांगली कामगिरी केली. शिवम दुबेने दमदार अष्टपैलू कामगिरी केली. कुलदीप यादव तर या स्पर्धेत भारताचा ट्रम्पकार्ड बनला होता त्याची फिरकी प्रतिस्पर्धी संघातील कोणत्याच फलंदाजाला समजली नाही. त्याने या स्पर्धेत सर्वाधिक १७ बळी टिपले. ही स्पर्धा भारतीय संघासाठी खूप महत्वाची होती कारण ऑपरेशन सिन्दुर नंतर भारत पहिल्यांदाच पाकिस्तान समोर उभा ठाकणार होता. त्यामुळे ही स्पर्धा जिंकून भारतीय खेळाडू पहलगाम हल्ल्यातील शहीदांना श्रद्धांजली वाहतील आणि भारतीय सैनिकांना मानवंदना देतील ही अपेक्षा होती अखेर ती खरी ठरली. भारतीय संघाने एकदा नव्हे तर तीनदा पाकिस्तानला चारी मुंड्या चित करून पहलगाम हल्ल्यातील शहिदांचा मैदानात बदला घेतला. संपूर्ण स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी पाकिस्तानी खेळाडूंशी हातमिळवणी केली नाही इतकेच नाही तर अंतिम सामन्यात विजय मिळवल्यानंतर पाकिस्तानी क्रिकेट बोर्डाच्या अध्यक्षांच्या हस्ते ट्रॉफी स्वीकारण्यास नकार देत पहलगामवर भ्याड हल्ला करणाऱ्या पाकिस्तानचा कृतीतून निषेध व्यक्त केला. भारतीय संघाच्या या कृतीने देशवासीयांची मने जिंकली. भारताने जरी ट्रॉफी स्वीकारली नसली तरी आशिया चषकाचा अंतिम सामना जिंकत भारतच आशियाचा राजा आहे हे सिद्ध केले. आशिया चषक विजेत्या भारतीय संघाचे मनापासून अभिनंदन !

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# मोबाईल बनतोय डेथ डिवाईस

अमेरिका देशामधील कॅलिफोर्निया राज्यातील मार्टीन कुपर यांनी सन १९७३ ला हॅण्डहेल,अर्थात सेल फोन बनवला. त्याचे वजन अंदाजे २ज्ञस होते. त्यामध्ये आधुनिक आणि गरजे नुसार बदल करून आता आपल्या खिशातले हॅण्डसेट तयार झाले. इतकी ही मोठी क्रांती मानवी जीवन सुखी करण्यासाठी ठरली. त्यांनी मोबाईल तयार केल्यावर मी दिवसाच्या ५% मोबाईल वापरतो. तुम्ही सुद्धा मोबाईल चा वापर भविष्यामध्ये चांगल्या कामासाठी आणि कमीत - कमी वेळ वापरा आणि जीवन सुखी करा. त्यापेक्षा जास्त वेळ वापराल तर त्याला मी जबाबदार राहणार नाही.असं त्यांनी मत व्यक्त केले होते.

१९७९ मध्ये जपान मध्ये निप्पॉन टेलिग्राफ ॲण्ड टेलिफोन ( NIAT ) व्दारे जगातील पहिले सेक्युलर नेटवर्क सुरू झाले. आणि भारतात मोबाईल सेवेची सुरुवात १३ जुलै १९९५ रोजी झाली.

मोबाईल फोनमुळे रेडिओ लहरी मार्फत दुरवरचा संवाद साधता येतो. त्यामुळे मोबाईल फोन आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग झाला. मोबाईल नेटवर्क मध्ये पण प्रगती झाली. वेगवेगळ्या कंपन्या या मध्ये उतरल्या. Artel, jio, BSNL, RELINCE, IDEA आणि मोबाईल पण आणि रिचार्ज पण स्वस्त केले. आणि सर्वाना सवय लावून टाकली. आपला धंदा वाढवला. आणि आता सर्व रिचार्ज महाग करून सवयीच्या आहारी गेलेल्या माणसाची या कंपन्या अक्षरशा लुट करीत आहेत.

मोबाईल मुळ बरीचं चांगली काम झाली. दु२वरच्या माणसांशी क्षणात संवाद व्हायला लागला. जग जवळ आलं. कोणतेही काम, कागद जीवनाच्या प्रसंगातील काही सुखाचे - दुःखाचे क्षण शेअर करण सोपं झालं. एवढचं काय पैश्याची देवाण - घेवाण ही सोप्पी झाली. जगाच्या बदलाची गती फारच वाढली. ही निश्चितच अभिमानाची बाब आहे. घरामध्ये जेवढी माणसं तेवढे फोन असं नकळत समीकरण तयार झालं. रेडीओ फक्त ऐकण्याचं साधन होते. दुरचित्रवाणी पाहण्याच साधन. पण मोबाईल आपल्या खिशात ज्यामध्ये प्रत्येक गोष्टीची उकल करण्याची चावी गुगलच्या माध्यमातून सापडली. आणि आपण जगाचं ज्ञान घेण्यासाठी सज्ज झालो.ज्ञान सागरा मध्ये पोहण्याची क्षमता यामुळे प्राप्त झाली.

वेगवेगळ्या वर्गाचा, पदव्यांचा, कलेचा, ज्ञानाचा कोणतेही क्षेत्र असो त्याची माहीती मोबाईल वर मिळायला लागली. आणि हो WORK FROM HOME ही CONCEPT आली. आणि गजइ घरात आला. वेड्या मनुष्याला एका अर्थानं बिना गुरुचं शहाणं करण्याचं काम झाल. पण समाजा मध्ये कितीही 2G,3G, 4G,5G आले तरी गुरुजीचं असण फार महत्वाचं असत. अन्यथा ज्ञानाच्या भडीमारामुळे सैरावरा, निर्बध नसलेली पिढी तयार होत असते. आणि सध्या झालीय सुद्धा.

मोबाईल हा ALL IN ONE झाला आहे. ऑफिसच्या मिटींग, गेमिंग, निकटवर्तीयांशी बोलणे, शेअर बाजार अपडेटिंग, कौटूबीक गप्पा, WHAT UP, FACEBOOK, INST-GRAM, MESSENJER E-MAIL या सारखे संबध जोडण्याचे FETURE उपलब्ध झाले म्हणून एकमेंकाना GOODMORNING पासुन सर्वच गोष्टी शेअर करायला लागला. एखादी घटना, शेती, परीसर, ऑफीस, रस्त्यावरील, घरातील अगदी सर्वचं त्यान मनमोकळं केलं. यातून काही बाबी चांगल्या झाल्या. पण भारताला इतिहास आहे. गुलामीत राहण्याची सवय लागलेल्या माणसांची आपण औलाद आहोत. ती औलाद लोकशाही मध्ये आनंदाने राहील तर नवलचं.... आणि याचा गैरवापर सुरू झाला.

PHONE PAY, GOOLE PAY, UPI, **वेगवे** Jio Banking app च्या मदतीने व्यवहार करून त्यातून DIGITAL चोरी तो करायला लागला... सामान्य लोक DIGITAL साक्षर नसलेल्या माणसांना फसवायला लागला.

काही तरुण तर सुसाट अभिव्यक्ती च्या नावाखाली वेगवेगळ्या रिल्स बनवायला लागले. काही महिला . सुद्धा यामध्ये कमी नाहीत. प्रत्येकीला आपल्याला व्यक्त होण्याचं साधन मिळालय असं वाटायला लागल. तरुण - तरुणीने तर लाजचं सोडलीय म्हणायला हरकत नाही. सेक्सचे वेगवेगळे व्हिडीओ पाहणं अगदी नॉर्मल झालंय. दुसऱ्याच्या बायकोला तुम्ही सुंदर दिसत आहात ? म्हणणं सोप्प झालंय. यातून बऱ्याचं जणाचं सुत जुळलं तर बर्याचं जणीचे संसार मोडले सुद्धा. खेड्यापाड्याने तर सर्व मुले free fire खेळत बसत आहे. हे उद्याचं भविष्य काही चांगल दिसत नाही. अशा प्रकारे मोबाईल चे परिणाम सामाजिक जीवनावर झालेले दिसत आहेत.

आज आपल्या जवळ २४ तास उपलब्ध असणारी जर कोणती गोष्ट असेल तर ती मोबाईल आहे. मोबाईल नसेल तर आपण अस्वस्थ होतो. त्याचा आपल्या जीवनावर वाईट परिणाम होत आहे. कारण तो आपल्या जीवनाचा अविभाज्य घटक झाला आहे. याचे परिणाम मानवी जीवनावर पूढील प्रमाणे होत आहेत.

आपल्या शरीरातील CENTRL NERVOUS SYSTEM चा संबध डोळ्याशी असतो.

वेगवेगळ्या रिल्स मधून मिळणारी माहीती ग्रहण करण्याची मेंदूची क्षमता नसते. त्यामुळे डोकेदुखीचा त्रास होतो.

डोळ्यांना कोरडेपणा येतो.

शरीराची ठेवण बदलत आहे. मानेचे मनक्याचे आजार वाढत आहेत.

रात्री what's up, Facebook, Rells, पाहण्याच्या नादात उशिरा झोपतो.

झोप पूर्ण न झाल्यामुळे सकाळी मन अस्वस्थ होते.

चिडचिडेपणा माणसात येतो.

फावल्या वेळात मोबाईल चा वापर वाढलेला दिसून येतो.

शारीरिक स्थिती सह मानसिक स्थिती बदलत आहे.

प्रत्येक ३० सेंकदानंतर आपले Concentration कमि झाले आहे

संसोधनातून असे सिद्ध झाले आहे की, मोबाईल मुळ मानसिक आरोग्य बिघडते. ऑफिस मधील वेगवेगळे संदेश, तणावपूर्ण ई - मेल, कामाचा ताण, मोबाईल ॲपवर भरावयाची माहीती, ेपश्रळपश work यामुळे मनावर ताण येतो. आणि दिवसाची सुरुवात तणावाने होते.

बऱ्याचं ठिकाणी मुलांना मोबाईल न दिल्यामुळे, हातातला हिसकावून घेतल्या मुळे मुलांनी आत्महत्या केल्या आहेत.

मोबाईल वापरामुळे आपले जीवन ५ - १० वर्षानी कमी होणार आहे.

X आणि Y गुणसुत्रा पैकी फक्त मुलामध्ये X गुणसुत्रच राहीले आहे. आणि मुले फक्त मुलीलाच जन्म देवू शकतात. हे संशोधनाने सिद्ध केले आहे.

वरील सर्व परिणामामुळ मोबाईल की डेथ डिवाईस ते थांबवावे लागेल.

यामुळे आपल्याला काही मोबाईल वापराचे नियम स्वतःला ठरवून द्यावे लागतील तेंव्हाच आपले परिणामा पासून संरक्षण होईल

सकाळी उठल्या बरोबर दोन तास मोबाईल न पाहणे.

मोबाईल मधील सर्व गेम डिलीट करणे.

फोन उचलणे आणि कामाचे बोलून ठेवणे.

फावल्या वेळात मोबाईल शी चाळा बंद केला पाहीजे.

सर्व आजाराचे मुळ आहे. सृष्टी पाहण्यासाठी दिलेल्या नेत्राची काळजी घेणे.

दिवसभरातील २४ तासापैकी २ तासापेक्षा मोबाईल पाहू नये.

अति वापर कराल तर जिवाला मुकाल.

यामुळे आपल्याला मिळालेले मोबाईल हे साधन जर आपल्यालाचं संपवायला निघाले असेल तर वेळीच सावध व्हा. अन्यथा आपली सवयचं आपल्याला मृत्युच्या दाराकडे ओढत नेईल. यात शंका नाही. कारण मोबाईल की डेथ डिवाईस याचा विचार केलेला बरा.

**एकनाथ पलमटे, जिल्हाध्यक्ष लसाकम, लातुर ८३७९०८३१००**

सेवाभाव, समर्पण आणि मानवतेचा दिव्य उत्सव; ७८व्या वार्षिक निरंकारी संत समागमाच्या सेवांचा शुभारंभ

# आत्ममंथन करून मनामध्ये व्याप्त दुर्गुण दूर करा- सद्‌गुरु माता सुदीक्षाजी महाराज

**जालना । प्रतिनिधी -** सेवाभाव समर्पण आणि मानवतेच्या दिव्य उत्सवाचे स्वरूप होऊ घातलेल्या ७८व्या वार्षिक निरंकारी संत समागमाच्या ग्राउंड सेवांचा शुभारंभ रविवार, दिनांक २८ सप्टेंबर २०२५ रोजी सद्गुरु माता सुदिक्षा जी महाराज आणि निरंकारी राजपिता रमितजी यांच्या पावन शुभहस्ते निरंकारी आध्यात्मिक स्थळ, समालखा येथे करण्यात आला. हा संत समागम ३१ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर, २०२५ दरम्यान आयोजित होणार आहे. प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी वार्षिक निरंकारी संत समागमाच्या सेवांची सुरुवात एका अत्यंत भावपूर्ण क्षणाने झाली. सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज आणि निरंकारी राजपिता रमितजी या दिव्य जोडीच्या शुभहस्ते या सेवांचे उद्घाटन करण्यात आले. हे दृश्य केवळ एक परंपरा जतन करणारे नव्हते, तर सेवा, श्रद्धा आणि मानवता यांच्या प्रति खोलवर आस्था असल्याचे जिवंत प्रतिबिंब ठरले. या शुभप्रसंगी मिशनची कार्यकारिणी समिती, केंद्रीय सेवादल अधिकारी तसेच हजारो भाविक भक्तगण सेवाभावनेने तन्मय होऊन उपस्थित होते.

या भव्य दिव्य आयोजनाच्या पूर्वतयारीच्या सेवांमध्ये भाग घेण्यासाठी संपूर्ण देशातीलच नव्हे तर मुंबई व महाराष्ट्रातून हजारोंच्या संख्येने सेवादल स्वयंसेवक व अन्य सेवादार भक्त समालखा (हरियाणा) स्थित निरंकारी आध्यात्मिक स्थळाकडे रवाना झाले आहेत.

या विविधतेने भरलेल्या जगामध्ये एका बाजूला मानवमात्र भाषा, संस्कृती, जातीपाती आणि धर्माच्या नावाखाली विभाजित झालेले दिसत आहेत तिथे दुसर्या बाजुला एक शाश्वत सत्य आपणां सर्वांना एका अतूट सूत्रामध्ये गुंफते आहे. आपण सर्व एकाच ईश्वराची लेकर आहोत जो ईश्वर वेळोवेळी अनेक रूपामध्ये साकार होऊन प्रेम, करुणा, समानता आणि मानवतेचा दिव्य संदेश देत आला आहे. आमची वेगवेगळी रूपं वेगवेगळे राहणीमान असूनही आमच्यामध्ये तीच एकसारखी चेतना, जीवनशक्ती प्रवाहित होत आहे. तीच आम्हाला एकमेकांशी जोडण्याचे कार्य करत आहे. हीच भावना आत्मसात करून संत निरंकारी मिशन मागील ९६ वर्षापासून ‘वसुधैव कुटुंबकम’ अर्थात ‘अवघे विश्व एक परिवार’ ही दिव्य भावना जिवंत करत आहे. निरंकारी मिशन केवळ प्रेम, शांती आणि समरसता यांचा पावन संदेश नसून सत्संग सेवा आणि विशाल संत समागमांच्या माध्यमातून तो कृतीत उतरवत आहे.

सद्गुरु माता सुदिक्षाजी महाराज आणि निरंकारी राजपिता रमितजी यांचे हार्दिक अभिनंदन संत निरंकारी मंडळाच्या प्रधान आदरणीय राजकुमारी तसेच संत निरंकारी मंडळाचे सचिव आदरणीय जोगिंदर सुखिजाजी यांनी पुष्पगुच्छ देऊन केले आणि शुभाशीर्वादांची कामना केली.

समागम सेवेच्या शुभारंभ प्रसंगी हजारोंच्या संख्येने उपस्थित दर्शनाभिलाषी भाविक भक्तगणांना संबोधित करताना सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज यांनी सांगितले, की आज समागम सेवांच्या पावन प्रसंगी उपस्थित राहताना अत्यंत आनंद होत आहे. प्रत्येकाच्या मनामध्ये जो उत्साह आहे, त्याची सुंदर झलक अनुभवायला मिळत आहे. नि:संदेह सत्संग, सेवा करत प्रत्येक मन भक्तीमय होत आहे. सर्वांमध्ये या परमात्म्याचे रूप पाहायचं आहे कोणत्याही प्रकारचा अभिमान न करता सर्वांचा आदर सन्मान करत सेवा करायची आहे. निरंकार प्रभूचे ध्यान करत या परमात्म्याची जोडून राहायचे आहे.




समागम हा केवळ समूह रुपात एकत्रित होण्याचे नाव नव्हे तर तो सेवेचा एक प्रबळ भाव आहे. आपण आपल्या अंतर्मनामध्ये डोकावून आत्ममंथन करत हे पाहायचे आहे, की आमचे जीवन खरोखरच कोणत्या दिशेने चालले आहे. परमात्मा आतही आहे आणि बाहेरही आहे. आपण स्वतःमध्ये कोणत्याही प्रकारची भिंत तयार करायची नाही, तर स्वतःच्या अंतर्मनात डोकावून मनामध्ये साठलेल्या उणीवांमध्ये सुधारणा करायची आहे. जवळपास ६०० एकर परिसरात पसरलेले हे समारंभ स्थळ सेवा, श्रद्धा आणि मानवतेचे प्रतीक आहे. इथे लाखो भक्तांचा निवास, भोजन, आरोग्य, आवागमन आणि सुरक्षा यासारख्या सर्व व्यवस्था पूर्ण श्रद्धेने व नि:स्वार्थ भावनेने केली जाते. देश विदेशातून आलेले संतजन सेवेमध्ये मग्न महात्मा आणि समाजाच्या सर्व थरांतून आलेले भाविक भक्तगण या महा उत्सवामध्ये सहभागी होऊन एकत्व, समर्पण आणि आत्मिक आनंद अनुभवतात.

यावर्षी समागमाचे शीर्षक ‘आत्ममंथन’ असे आहे. याचा अर्थ आपण आपल्या अंतरात डोकावून विचार आणि कर्मांना आत्मज्ञानाने शुद्ध करण्याची प्रेरणा होय. हा प्रवास सद्गुरुकडून प्रदत्त ब्रह्मज्ञानानेच सुरू होतो आणि आत्मिक शांती, आनंद व मोक्षाचे द्वार उघडतो.

मानवतेचा हा दिव्य उत्सव फक्त निरंकारी मिशनच्या अनुयायांनाच नव्हे तर प्रत्येक धर्म, जात, भाषेच्या देश-विदेशातील मानव प्रेमींचे खुल्या दिलाने स्वागत करतो. ही अशी भूमी आहे जिथे मानवता आध्यात्मिकता आणि सेवाभाव यांचा अनुपम संगम दृष्टिगोचर होतो. एक अशी अलौकिक अनुभूती प्रदान करतो, जी शब्दांच्या पलीकडील आहे.

## पान १ वरुन

### तात्काळ कार्यान्वित ...

गंभीर खेळ आहे. आमच्या माहितीनुसार हे मशीन अजून सुरू न होण्यामागे राजकीय मुहूर्तशोध आणि खाजगी व्यवसायिकांचे दबावकारण दोन्ही असून, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते उद्घाटन व्हावे यासाठी मशीनचे उद्घाटन जाणीवपूर्वक थांबवले असल्याचे या रुग्णालयातील कर्मचारी खाजगी सांगतात. तसे असेल तर हे दुर्दैवी आहे. जिल्हा शल्यचिकित्सकांनी तात्काळ कारवाई करून मशीन सुरू केले पाहिजे, अन्यथा मराठा महासंघ तीव्र आंदोलन छेडेल, असा इशारा जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख, जिल्हा कोषाध्यक्ष अशोक पडूळ, माजी बांधकाम सभापती रमेश जाधव, प्रा. संतोष कऱ्हाळे, ड. शैलेश देशमुख, संतोष कऱ्हाळे, कामगार आघाडीचे जिल्हाध्यक्ष मंगेश मोरे, कार्याध्यक्ष सचिन जगधने, रवीकुमार सूर्यवंशी आदींनी दिला आहे.

### मराठी भाषेवर ...

बसवाज कोरे,श्रीकांत गायकवाड, लक्ष्मीकांत दाभाडकर, रमाकांत कुळकर्णी,डॉ.सत्यशीला तौर,डॉ.प्रा.ज्योती धर्माधिकारी,सुचीता कुळकर्णी,विठ्ठलराव काष्टे,अशोक पाठक,शिवाजीराव कायंदे,प्रभाकर शेळके, राजाराम जाधव, कृष्णा आर्दड,कल्याणी देशमुख, अजय देशमुख इ. कवी व कवियत्री यांनी आपले काव्य अत्यन्त उत्साहात सादर करून उपस्थित सर्व साहित्य रसिकांना मंत्रमुग्ध केले. या कार्यक्रमाचे उत्तम प्रकारे आयोजन केल्याबद्दल रविंद्र तौर व त्यांच्या कार्यकारिणीचे ठाले पाटील यांनी कौतुक केले. याप्रसंगी शिवकुमार बैजल,संतोष तांबे,संजीव कुळकर्णी,देवीदास फुलारी,सविता जाधव,मोईब कादरी, पंडितराव तडेगावकर, माजी अध्यक्ष मसापा प्रा.रमेश भुतेकर,प्राचार्य सुनंदा तिडके, प्रा.यशवंत सोनुने,डॉ. जगन्नाथ खंडागळे, बसवराज कोरे,प्रा.बबनराव दिरंगे,प्रा. नारायणराव बोराडे, अंकुशराव ेशमुख, गुलाबराव पाटील,सतिश तवरावाला,सोपानराव भांदरगे,शिवकुमार सोंळके, ॲड.विलास भुतेकर, सुरेश शर्मा,माऊली कदम,राजेंद्र गोरे, अशोक उबाळे, विलास झुंबड, सत्यनारायण काळे,रावसाहेब ढवळे,रामेश्वर लोया,रघुनाथ ताठे,सुभाष खंडागळे कल्याण बागल इ. मान्यवर तसेच मराठवाड्यातील मसाप शाखेचे पदाधिकारी मोठ्या संख्येत उपस्थित होते.

### उद्योजकांसाठी ...

केले जाणार असून, बाजारपेठ विस्तार, सरकारी निविदांमध्ये प्रवेश आणि आरएएमपी अंतर्गत मिळणारे सहाय्य याबाबतही सविस्तर माहिती दिली जाणार आहे. या कार्यक्रमात अनुसूचित जाती-जमातीतील उद्योजक, ग्रामीण एमएसएमई तसेच महिलांच्या नेतृत्वाखालील व्यवसायांवर विशेष लक्ष केंद्रित केले जाणार आहे. सहभागींच्या उद्योगज्ञानासाठी प्रत्यक्ष प्रशिक्षण, केस स्टडी आणि तज्ज्ञांचे मार्गदर्शन सत्रे यामध्ये समाविष्ट असतील. प्रशिक्षणासाठी ‘उद्योग आधार (उत्पादक)प्रमाणपत्र अनिवार्य आहे. इच्छुक उद्योजकांनी निशुल्क नावनोंदणीसाठी रोटरी क्लबचे संचालक व प्रकल्प प्रमुख किशोर देशपांडे (मो. ९४२२७२३३४९) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन रोटरी क्लब ऑफ जालनाच्या अध्यक्षा सौ. वर्षा पित्ती व सचिव लक्ष्मीनिवास मल्लावत यांनी केले आहे.

### एकरी किमान ...

प्रत्येक गावात तीव्र आंदोलन उभारले जाईल, असा इशारा मनसेने दिला आहे.

महाराष्ट्रातील शेतकरी समाज प्रचंड अडचणीत असून, मनसेने सरकारसमोर स्पष्ट मागणी ठेवली आहे एकरी ३० हजार मदत तातडीने जाहीर करा, नाहीतर राज्यव्यापी आंदोलनाला तयार रहा!

# आदिवासी आश्रमशाळेत ‘स्वस्थ नारी सशक्त परिवार’ उत्साहात

**परतूर । प्रतिनिधी -** येथील आदिवासी आश्रमशाळेत स्वस्थ नारी सशक्त परिवार हा उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. हा कार्यक्रम मेरा युवा भारत, जालना व आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्ट, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता. सदरील कार्यक्रम हे प्रणित सांगवीकर, जिल्हा युवा अधिकारी, मेरा युवा भारत, जालना यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाला आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्टच्या परतूर तालुका समन्वयक अमृता ठाकुर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी पाहुण्यांचे स्वागत करून प्रस्तावना मांडली. प्रमुख मुख्याध्यापक श्री. एस. बी. जाधव यांनी विद्यार्थिनींना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्री. मुसळे सर तसेच अधीक्षिका श्रीमती पल्लवी अनकर यांचे विशेष योगदान लाभले. सदर कार्यक्रमाच्या सुरुवातीस आश्रमशाळेतील विद्यार्थिनींनी स्वागतगीत सादर केले. त्यानंतर विद्यार्थिनींना अमृता ठाकूर यांनी स्वस्थ नारी सशक्त परिवार या उपक्रमाविषयी माहिती देण्यात आली. या सत्रामध्ये मुलींच्या आरोग्याशी संबंधित विविध प्रश्नांची उत्तरे देण्यात आली. मासिक पाळी स्वच्छता, पोषण, मानसिक आरोग्य आणि आत्मविश्वास वाढविण्याविषयी संवाद साधला गेला.

### अतिवृष्टी व पूर परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर रोगराई पसरण्याचे अधिक शक्यता !

# जीवन प्राधिकरण आणि जिप पाणीपुरवठा विभागाने सतर्क राहून शुद्ध पाणीपुरवठा करावा - आ. बबनराव लोणीकर

**परतुर । प्रतिनिधी -** परतुर विधानसभा मतदारसंघांमध्ये १७३ गाव व ९५ गाव ग्रीड मंजूर करण्यात आलेली होती. या वॉटर ग्रीड अंतर्गत सर्वसामान्य जनतेला पिण्याचे शुद्ध पाणी देण्याची ही महत्त्वाकांक्षी योजना आहे. या योजनेअंतर्गत आतापर्यंत सर्व गावांमध्ये पाणी पोहोचणे अपेक्षित होते परंतु महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ने अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता उपअभियंता शाखा अभियंता व कंत्राटदार यांनी संगनमताने ही योजना पूर्ण झालेली नसताना योजना आर्थिक व भीतिकदृष्ट्या पूर्ण झाले असल्याचा खोटा अहवाल शासनाकडे सादर केला आहे, असेही आमदार बबनराव लोणीकर यांनी स्पष्ट केले आहे.

मुख्य जलकुंभापासून जलकुंभापर्यंत व जलकुंभापासून गावातील पाण्याच्या टाकीपर्यंत पाणी सोडत असताना हायड्रोलिक टेस्ट करणे अपेक्षित आहे १७३ गाव वॉटर ग्रीड गधील गापेगाव विहीर उद्भव पासून ते जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत एकच हायड्रोलिक टेस्ट करण्यात आली आहे त्या व्यतिरिक्त कुठलीही टेस्ट करण्यात आलेली नाही. वितरण व्यवस्थेची कुठलीही हायड्रोलिक टेस्ट करण्यात आलेली नसेल तर योजना आर्थिक दृष्ट्या व भोतिक दृष्ट्या पूर्ण कशी झाली? असा प्रश्न पडतो आहे. पाईपलाईन हि फक्त आर्धा फुट खोदली आहे कुठे अर्धा फुट तर कुठे दीड फुट खोदून पाईपलाईन टाकल्यामुळे लिकेज आणि फुटतुट मोठ्या प्रमाणात होत आहे शेतीची मशागत करताना नांगराच्या फळामुळे पाईप लाईन फुटते हायड्रोलिक टेस्ट न करता योजना चालवल्यास सदरील योजना फार काळ टिकणार नाही हे माहीत असताना देखील आर्थिक अगिषा पोटी या सर्व अधिकाऱ्यांनी या दोन्ही वॉटर ग्रीड योजनेची माती केली आहे. असेही आमदार लोणीकर यावेळी म्हणाले.

दि. ७ डिसेंबर २०२३ रोजी १७३ गाव वॉटर ग्रीडचे उर्वरित १२ कोटी रुपयाचे संपूर्ण बिल अदा करण्यात आले त्यावेळी ५२ गावात पाणी पोहोचलेलेच नव्हते ते आजही आजच्या तारखेत पोहोचलेले नाही. तसेच दि. २७ डिसेंबर २०२३ रोजी ९५ गाव वॉटर ग्रीड चे १३ कोटी रुपयाचे संपूर्ण बील अदा करण्यात आले, त्या तारखेपर्यंत एकही गावात पाणी पोहोचलेले नव्हते. असे असताना अधिकाऱ्यांनी मात्र संबंधित कंत्राटदाराशी संगणमत करून आर्थिक व्यवहार करत सर्व गावांमध्ये पाणी पोहोचले असल्याचा खोटा अहवाल सादर केला आहे. मुख्य अभियंता लोलापाड, अधीक्षक अभियंता कोळी, कार्यकारी अभियंता, उप अभियंता, शाखा अभियंता व कंत्राटदार यांनी संगनमताने आर्थिक व्यवहार करून शासनाला खोटा अहवाल तर सादर केला आहे परंतु आपण वारंवार केलेल्या सूचनेचे व आदेशाची देखील अवहेलना केली आहे. ही योजना पूर्ण झाल्यानंतर 03 वर्षे संबंधित कंत्राटदाराने सदरील योजना चालवायची आहे त्यानंतरच कंत्राटदराला पूर्ण बिल देणे अपेक्षित आहे, तसा करार व नियम आहे. परंतु गावातील टाकीमध्ये पाणी पोहोचले नाही. असेही लोणीकरांनी दिलेल्या पत्रात स्पष्ट केले आहे.

सद्यस्थितीत संपूर्ण मराठवाड्यात अतिवृष्टी ने थैमान माजवले असून माझ्या परतूर विधानसभा मतदार संघात देखील खूप पाऊस पडला आहे सर्वत्र पाणी साचलेले असून अगोदरच मोठ्या प्रमाणात रोगराई पसरत आहे वाटर ग्रीड चे पाणी बंद असल्यामुळे नागरिकांना नदी नाल्याचे ओढ्याचे दुषित पाणी प्यावे लागत आहे यामुळे अतिवृष्टी च्या या गंभीर परिस्थिती आसमानी संकटाबरोबरच सुलतानी संकट देखील आहे दुषित पाण्यामुळे मतदार संपातील लोकांना गेस्ट्रो, लूजमोशन या सारखे आजार पसरण्यास सुरवात झाली आहे पाणी बंद असल्या बाबत वारंवार महाराष्ट्र जिवन प्राधिकरणचे सदस्य सचिव प्रधान सचिव मुख्य अभियंता, अधिक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता व कंत्राटदार यांना सूचना केलेल्या असूनही अद्याप पर्यंत पाणी पुरवठा सुरळीत झालेला नाही तरी आपण संबधितांवर कठोर कारवाई करण्यासह तात्काळ दोन्ही वॉटर ग्रीड चा पाणी पुरवठा सुरळीत करावा असेही आमदार लोणीकर यांनी म्हटले आहे.



बबनराव लोणीकर यांनी जिल्हाधिकारी जालना यांनी देखील या पत्राद्वारे संबंधित योजनेचा अहवाल शासनाला सादर करावा अशी सूचना केली आहे त्यानुसार १७३ गाव ९५ गाव वॉटर ग्रीड मधील केंद्र व राज्य सरकारची फसवणूक करत काम पूर्ण न करता काम पूर्ण झाल्याचा अहवाल देणे, कंत्राटदाराचे संपूर्ण बिल अदा करणे, काम न करता २६ कोटी रुपयांचे बिल उचलण्यास मदत करणारे अधीक्षक अभियंता कार्यकारी अभियंता उपअभियंता व शाखा अभियंता यांच्यावर कठोर स्वरुपाची कारवाई करण्यासह मागील महिन्याभरा पासून वाटर ग्रीड चे पाणी संबंधित कंत्राटदाराने बंद केले असल्याचा अहवाल राज्याचे मुख्य सचिव, पाणी पुरवठा विभागाचे प्रधान सचिव, सदस्य सचिव व मुख्य अभियंता यांना आपल्या कार्यालयाचा अहवाल पाठवण्यात यावा असेही लोणीकरांनी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे

---

# शेती सुधारणांची चुकलेली दिशा

साधी बाब आहे. तो जर आज उध्वस्त झाला असेल तर काल त्याला कोणी तरी क्षीण केलेले असणार. लुटलेले असणार. शेतकऱ्यांच्या बाबत असा का विचार करीत नाहीत?

अतिवृष्टी झाली, दुष्काळ पडला, की शेतकरी कोलमडून पडतो. कारण काल त्याला कोणीतरी लुटलेले असते. पूर आला, छप्पर कोसळले कारण त्याला पक्के घर बांधण्याची ऐपत कोणीतरी हिरावून घेतलेली असते. जनावरे वाहून गेली कारण उंचावर गोठा बांधण्याची ऐपत येऊ दिली गेलेली नसते. शेतात पाणी भरले कारण पाणी वाहून जावे अशी बांधबंधिस्ती करण्यासाठी जी बचत त्याच्याकडे असावी लागते, ती येऊच दिली गेलेली नसते. पीक बुडाले, आता तो काय करणार? वर्ष कसे काढणार? हे प्रश्न तेंव्हाच निर्माण होतात, जेंव्हा होल्डिंग लहान असते. सीलिंग कायद्याने होल्डिंगवर मर्यादा आणलेली. आता दुसरे काय होणार?. पाऊस जास्त झाला हे निमित्त झाले पण आधी शेतकऱ्यांना लुटले हे कारण आहे. लोक निमित्ताला कारण समजतात. तेव्हढ्यापुरती मलमपट्टी करतात. कारण तसेच राहते. जोपर्यंत कारणांचे निराकरण होत नाही तोपर्यंत शेतकऱ्यांचे ना दैन्य संपणार आहे ना दैना. शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न झाले नाहीत, असे नाही. पण सरकारी प्रयत्नांची दिशा सतत चुकत राहिली. म्हणून लाखो कोटी रुपये खर्च होऊनही प्रश्न जिथल्या तिथेच राहिले. अनेक प्रश्न अधिक जटिल झाले, अधिक रौद्र झाले.

### सरकारी सुधारणांची दिशा

सरकारने काय प्रयत्न केले? हे एकदा तपासून पाहू. स्वातंत्र्य मिळाले तेंव्हा त्याकाळच्या सरकारच्या समोर जनतेचे पोट कसे भरेल असा प्रश्न होता. आजच्या तुलनेत त्याकाळची लोक सांख्या खूप कमी होती. बहुसंख्य लोक शेतीवर अवलंबून होते. पण सर्वांचे पोट भरेल एवढे अन्नधान्याचे उत्पादन होत नव्हते. सरकारला दोन मार्ग सुचले. जमिनीचे लहान तुकडे केले तर उत्पादन वाढेल म्हणून त्यांनी जमिनीचे तुकडे करण्याचा सपाटा लावला. जमीदारी निर्मूलनाचा कायदा अगोदरच आणला होता, पाठोपाठ कूळ कायदा आणला, त्यावरही परिस्थिती सुधारली नाही म्हणून सीलिंग कायदा आणला. पण उत्पादन फारसे वाढले नाही. १९६०-७०च्या दशकात नॉर्मन बोरलॉग या शास्त्रज्ञाने संकरित बियाणांचा शोध लावल्यानंतर अन्नधान्याचे उत्पादन वाढले. भारतात सरकारच्या उपाय योजनांमुळे नव्हे, या नव्या शोधामुळे उत्पादन वाढले. हे ढळढळीत दिसत असताना देखील सरकारने धडा घेतला नाही. भूमी सुधारणांची अंमलबजावणी काठोरपणे करीत राहीले. त्याचे दुष्परिणाम आज दिसत आहेत. जमीन धारणा (होल्डिंग) इतकी लहान झाली आहे की गुंठ्यावर वाटण्या होऊ लागल्या आहेत. शेतीवर उपजीविका करणे दुरापास्त झाले आहे. लाखो शेतकऱ्यांना आत्महत्या कराव्या लागल्या. ही सर्वात वाईट परिस्थिती निर्माण झाली.

### फसव्या सरकारी योजना

शेती आणि शेतकरी यांच्या बाबत एकूण एक सरकारी योजना फसल्या. की या योजनांच मुळी फसण्यासाठीच केल्या होत्या अशी शंका येते. सरकार शेतकऱ्यांच्या जीवावरच उठले आहे, परंतु विरोधी पक्ष आणि शेतकरी संघटनासुद्धा चुकीच्या उपाययोजनांचाच पाठपुरावा करताना दिसतात. चुकीच्या मागण्या आणि निकामी योजना यामुळे शेतकरी भांबावून गेले आहेत.

कोणत्या उपाय योजना सुचवल्या जातात? १) हमीभाव २) कर्जमाफी ३) अनुदान ४) सिंचन सुविधा ५) कल्याणकारी योजना आणि ६) सत्तेत सहभाग साधारणपणे या सहा मागण्यात सगळ्या विचारसरणीचे, सगळ्या पक्षांचे, सगळ्या संघटनांचे व सगळ्या स्वयंसेवी संस्थांचे लोक घुटमळत राहतात. या सहाच्या सहा उपाययोजना सरकारीकरणाच्या बाजूने जातात म्हणून डाव्यांच्या लाडक्या आहेत. उजव्यांना हिंदू-मुसलमान करण्याच्या पलीकडचे काही कळत नाही. अर्थशास्त्र कळणे लांब राहिले, त्यांना शेतकऱ्यांचे प्रश्न देखील कळत नाहीत म्हणून ते डाव्यांच्या सुरात सूर मिसळत राहतात. शेतकऱ्यांच्या बाबतीत जे जे डाव्यांनी सुचविले ते ते आणि तेवढेच उजवे बोलताना दिसतात. किंबहुना तेच द्ङ्कुक दिसतात.

### भाव मागणे पुरेसे नाही

हमीभावाची मागणी केली जाते. मी म्हणतो, सरकार कोण आहे आमच्या मालाची किंमत ठरवणारे? सरकार आमचे मालक आणि आम्ही सरकारचे वेठबिगार आहोत का? शेत आमचे, आमच्या कष्टाने आम्ही माल पिकवला. त्याचा भाव तिसऱ्याने का ठरवायचा? म्हणे सरकारने खरेदी करावी. का बरे? सरकारी दावणीला शेतकऱ्यांना बांधून शेतकऱ्यांचे भले होणार आहे का? पूर्वी कापूस एकाधिकार योजना होती. शेतकऱ्यांचे त्यातून अजिबात हित झाले नाही. योजनेतील सरकारी कर्मचारी, पोलीस, व्यापारी आणि पुढारी मात्र गब्बर झाले. मागे तुरीची सरकारी खरेदी केली होती, त्या वेळेस शेतकऱ्यांची किती फरफट झाली होती, ती सगळ्यांनी पाहिली आहे. सरकारच्या मक्तेदारीने शेतकऱ्यांचे नुकसान होते, हे अनेकदा अनुभवायला आलेले आहे. इतरांसारखे सरकारही खरेदी करणार असेल तर माझी ना नाही. पण सरकार बाजाराचा नाश करणार असेल तर ते शेतकऱ्यांना अंतिमतः घातकच ठरणार.

मुळात शेतकरी आपल्या मालाची किंमत का ठरवू शकत नाहीत? भाव ठरवण्यात कोणती अडचण आहे? ती समजावून घेऊन ती दूर करण्यावर भर दिला पाहिजे. पण याबाबत सरकार, विरोधी पक्ष आणि शेतकरी नेते हे काहीच बोलत नाहीत.

एका कुटुंबाला माणसासारखे जगायला किमान १८ हजार रुपये लागतात. मागे चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्याचा पगार ठरवताना हा निकष लावला. दोन एकरच्या कोरडवाहू शेतकऱ्याच्या सोयाबीनला काय भाव दिला म्हणजे त्याला वर्षाला सव्वा दोन लाख रुपये मागे पडतील? कोणता भाव मागता? कोणासाधी भाव मागता? याचाही विचार केला पाहिजे.

किसानपुत्र आंदोलनाने अनेक बाजूने विचार केला असून भाव न मिळण्याचे कारण १) कमाल शेतजमीन धारणा कायदा २) आवश्यक वस्तू कायदा ३) जमीन अधिग्रहण कायदा हे तीन कायदे आहेत हे दाखवून दिले आहे. या कायद्यांचे स्वरूप आणि दुष्परिणाम भीषण असतानाही त्याबाबत जेवढा विरोध व्हायला हवा, तेवढा होतांना आज दिसत नाही.

### पुन्हा पुन्हा कर्जबाजारी

कर्जमाफीतील माफी हा शब्द चुकीचा आहे. माफी गुन्हेगारांना दिली जाते. शेतकरी गुन्हेगार नाहीत. त्यापेक्षा 'कर्ज बेबाकी' म्हणा. कर्जाची बाकी संपवणे म्हणजे कर्ज बेबाकी करणे. आधी शेतकरी कर्जबाजारी का होतो हे समजावून घ्या. कर्जबाजारी होण्याचे मुख्य कारण असे की, त्याच्या व्यावसायात बचत मागे पडत नाही, हे आहे. बचत मागे न पडण्याचे कारण वरील तीन कायदे आहेत. त्यांच्या व्यवसायाचा आकार अव्यवसायिक (अनव्हायएबल) झाला आहे. सरकार त्याला भाव मिळू देत नाही. त्याच्या व्यावसायात नवी गुंतवणूक होत नाही. याचा अर्थ वरील तीन कायदे कारण आहेत. ते कायदे रद्द करून घेतल्याशिवाय शेती व्यायवसायिक होणार नाही, आणि कर्ज बेबाकीचा मुद्दा निकाली निघणार नाही.

आपल्याकडची कर्जमाफीत आणखी एक घोळ आहे. ती प्रामुख्याने बिगर शेतकऱ्यांना दिली जाते. अनेक कंपन्या कृषी कर्ज काढतात. त्यांचे कर्ज कोट्यावधी रुपयांचे असते. ते त्यांना बेबाक करून हवे असते. सरकारी नोकर कायद्याने दुसरा व्यवसाय करू शकत नाहीत पण ते शेती व्यवसाय करतात. तरी त्यांना कर्ज बेबाकी हवी असते. शेतीवर आयकर नसल्यामुळे अनेक व्यावसायिक, व्यापारी शेती दाखवतात. मोठे कर्ज घेतात. त्यांचे कर्ज बेबाक केले जाते. शेतकरी म्हणजे ज्याचे उत्पन्नाचे मुख्य साधन शेती आहे, अशी व्याख्या केली तर आज फक्त १० ते २० टक्के शेतकरी आहेत. मला वाटते अपात्र लोकांना जी रक्कम तुम्ही वाटता ती खऱ्या शेतकऱ्यांना द्यायला हवी.




### पिंजऱ्यातील दाणे

अनुदान दोन स्थितीत दिले जाते. पिंजऱ्यात पक्षी बंद ठेवायचे आणि त्याला दाणे टाकत रहायचे. ही पद्धत भारतात आहे. दुसरी पद्धत पक्षी मोकळे ठेवायचे आणि जंगलात जाऊन त्यांच्यासाठी साठी दाणे टाकायचे. अमेरिका वगैरे देशात ही दुसरी पद्धत वापरली जाते. या दोन पद्धतीत गुणात्मक फरक आहे. गुलामाला टाकलेला तुकडा आणि स्वतंत्र माणसाला केलेले सहकार्य असा हा फरक आहे.

गुलामांना दिलेले अनुदान अंगी लागत नाही. आधी स्वातंत्र्य आणि मग सहकार्य, हा क्रम योग्य ठरेल. भारतात दिलेल्या अनुदानांचे परिणाम न दिसण्याचे मुख्य कारण वरील तीन कायदे आहेत.

### सिंचन सुविधा

सिंचन सुविधा निर्माण केल्या तर शेतकऱ्यांत समृद्धी येते असे मानले जाते. हे खरे आहे की, सिंचन सुविधा निर्माण झाल्या तर शेतकरी दोन हंगाम (खरीप व रब्बी) घेऊ शकतो. पण त्यामुळे त्यांची परिस्थिती सुधारते असे दिसत नाही. शरद जोशी यांनी हा फरक सांगताना म्हटले होते की, 'कोरडवाहू शेतकऱ्याची हजामत बिनपण्याने होते आणि बागायत शेतकऱ्याची हजामत पाणी लावून होते.' एक पीक काढणाऱ्या कोरडावाहू शेतकऱ्यावर एक पट कर्ज असेल तर बागायत शेतकऱ्यावर दुप्पट असायला हवे. पण हे कर्जाचे प्रमाण दहापट असल्याचे दिसून येते. कोरडवाहू शेतकऱ्यांचे होल्डिंग दोन एकर असेल तर बागायत शेतकऱ्याचे होल्डिंग किमान चार एकर असायला हवे. प्रत्यक्षात ते खूप कमी झालेले दिसते. २ एकर कोरडवाहू शेतकर्याचे होल्डिंग आहे तेथे बागायत शेतकऱ्याचे होल्डिंग १० गुंठे एवढे कमी झालेले दिसते. त्यामुळे सिंचन वाढले तर शेतकऱ्यांच्या परिस्थितीत सुधारणा होते असे दिसून येत नाही. परिस्थिती न सुधारण्याचे मुख्य कारण वरील शेतकरीविरोधी कायदेच आहेत.

### कल्याणकारी योजना

कल्याणकारी योजना गुलामीत फलद्रुप होत नसतात, त्यांच्यासाठी हवे असते स्वातंत्र्य! खरे तर लोककल्याण करणे म्हणजे स्वातंत्र्याचा विस्तार करणे होय. शेतीसाठी असलेल्या सर्व कल्याणकारी योजनांवर लाखो रुपये खर्च केले जातात. त्यावर मोठी नोकरशाही पोसली जाते. शेतकऱ्यांना त्यांचा काही उपयोग होत नाही. वाळूवर टाकलेले पाणी कोठे गेले हे जसे कळत नाही तसे कल्याणकारी योजनांवरील पैश्याचे आहे.

### सत्तेत जाणे शक्य आहे का?

तुम्हाला शेतकऱ्यांचे प्रश्न सोड्याचे आहेत ना? शेतकऱ्यांना स्वातंत्र्य मिळवून द्यायचे आहे ना? शेतकरी विरोधी कायदे रद्द करायचे आहेत ना? मग तुम्ही सत्तेत जा. तोच एक मार्ग आहे. असे मला चार-दोन नव्हे हजारो लोकांनी सांगितले. मी सत्तेत गेल्याने प्रश्न सुटतील का? एकट्याने मला काही करता येईल का? अजिबात नाही. जेंव्हा पासून आपल्या राज्य घटनेत परिशिष्ट १० समाविष्ट करण्यात आले आहे, तेंव्हापासून एकट्या लोकप्रतिनिधीची ताकत संपुष्टात आली आहे. आता श्रेष्टींचे राज्य चालते. तुम्ही एकटे असाल तर श्रेष्टी बनण्याची शक्यता सुतराम नसते. मग म्हणतात, पक्ष काढा. पक्ष सत्तेत आणा. अजिबात अनुभव नसलेले भाबडे लोकच असा सल्ला देतात. पक्ष काढणे अवघड नाही. पण त्या पक्षाला मते कसे मिळतील? हा प्रश्न आहे. निवडणुकीत सरस सिद्ध होण्यासाठी आपल्या तथाकथित लोकशाही निवडणूक पद्धतीत पाच गोष्टी आवश्यक ठरतात. १) झुन्डींचे मतदान- यासाठी तुम्हाला जाती-धर्माच्या झुंडी झुलवता आल्या पाहिजे. २) गुंडांचे संगोपन- बोगस मतदान करून घेण्यासाठी गुंड सांभाळावे लागतात. त्यांचे संगोपन करावे लागते. ३) वाटपासाठी पैसा- यासाठी पैसेवाले लोक तुमचे पाठीराखे असावे लागतात. ४) भिकेच्या योजना- सरकारी तिजोरीतून तुम्ही भीक देऊ शकला पाहिजेत. हे काम फक्त सत्ताधारी करू शकतात. लाडकी बहीण त्याचे उत्तम उदाहरण आहे. विरोधी पक्ष अशी आश्वासने देऊ शकतो. काही विरोधी पक्ष त्याबाबत वाकबगार ठरली आहेत. ६) यंत्रणेवर ताबा- अलीकडे ही ताकत निर्णायक ठरली आहे. सत्ताधारी पक्ष जर निवडणूक यंत्रणेवर काबीज असेल तर तुम्ही कितीही झटलात तरी निकाल त्यांच्याच बाजूने लागतो.



वरील सहा गोष्टीत माझे काय स्थान आहे? माझी काय क्षमता आहे? असे प्रश्न विचारले तर सहज उत्तर मिळेल की हा खेळ आता आपला राहिलेला नाही.

### मग काय करायचे?

जेंव्हा संकट मोठे असते तेंव्हा तयारीही तेवढ्याच ताकदीने करावी लागते. किसानपुत्र आंदोलनाने या गोष्टीचा बारकाईने विचार केला आहे. जेथे सांध मिळेल तेथून वाट काढीत जावे लागणार आहे. पण जे प्रचलित मार्ग आहेत तेही सोडता कामा नये. १) पहिला मार्ग प्रबोधनाचा आहे. शेतकरी विरोधी कायदे व त्यांचे दुष्परिणाम तरुणांना समजावून सांगणे, त्यासाठी प्रचाराची मोहीम राबवणे. यातून जनमताचा रेटा निर्माण करणे. २) चळवळ उभी करणे- यासाठी आम्ही तूर्त १९ मार्च व १८ जून ह्या तारखा ठरवल्या आहेत.१८ जून रोजी साहेबराव करपे यांच्या सहकुटुंब आत्महत्येचा स्मृती दिन आहे. १९८६ साली ह्या आत्महत्या झाल्या होत्या. त्या दिवशी लोकांनी उपवास (अन्नत्याग) करावा. १८ जून १९५१ पहिई घटना दुरुस्ती (बिघाड) झाली होती. त्यातून परिशिष्ट ९ आले होते. परिशिष्ट ९ मध्ये टाकलेल्या कायद्यांच्या विरुद्ध न्यायालयात जाता येत नाही. या बिघाडाने शेतकरी गुलाम झाले. या दिवशी आम्ही सर्व सत्ताकारभाऱ्याना निवेदन पाठवतो. काळे झेंडे लावतो. काळी फीत बांधतो. ३) संदीय लढाई- आज आम्ही निवडणुका लढवू शकत नाहीत. पण निवडणुकीत आम्ही मतदार म्हणून आपली भूमिका सांगू शकतो. व ते आम्ही करीत आलो आहोत. ही देखील एक संसदीय भूमिका आहे. जन चळवळीचा रेटा वाढल्या नंतर ही भूमिका देखील निर्णायक ठरू शकते. ४) न्यायालयीन लढाई- मकरंद डोईजड यांनी दाखल केलेल्या याचिकेच्या बाजूने असंख किसानपुत्र उभे राहिले होते. दुर्दैवाने ती याचिका खारीज झाली. आताही अनेक किसानपुत्र न्यायालयाचे दार ठोठावयाची तयारी करीत आहेत.

शेतकरी विरोधी कायद्यांची लढाई याश्सी करण्यासाठी एका बाजूला न्यायालयीन लढाई लढत निवडणूक सुधारणा आणि कर पद्धतीत सुधारणा यांचाही विचार करावा लागेल.

**अमर हबीब, अंबाजोगाई**
**किसानपुत्र आंदोलन**
**८४११९०९९०९**

***

### पूरग्रस्तांसाठी शाळा, सभामंडप, मंगल कार्यालयाच्या ठिकाणी निवारा छावण्यांमध्ये जेवणाचे वितरण सुरू

# बोटीने पूरग्रस्त भागात पोहोचले आमदार लोणीकर

### ‘जीव वाचवा, काळजी घ्या’ आ. बबनराव लोणीकर यांचे नागरिकांना आवाहन





**परतूर । प्रतिनिधी -** परिसरात सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या पूर परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी घाबरून न जाता, योग्य ती काळजी घेण्याचे आणि सुरक्षित राहण्याचे कळकळीचे आवाहन केले आहे. त्यांनी नागरिकांना धीर देत प्रशासकीय यंत्रणा आपल्या सर्वांच्या मदतीसाठी सज्ज असल्याचे आमदार बबनराव लोणीकर यांनी सांगितले.

**प्रशासनासोबत समन्वय साधा**

गोळेगाव चांगतपुरी सावरगाव बुद्रुक संकनपुरी गंगा सावंगी या गोदाकाठ च्या पूरग्रस्त गावांचा दौरा केला याप्रसंगी आमदार बबनराव लोणीकर बोलत होते, पावसाचा जोर आणि नदी-नाल्यांची पाणी पातळी वाढल्यामुळे अनेक गावांमध्ये पूर परस्थिती निर्माण झाली आहे. नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता संयम बाळगावा. यावेळी आमदार लोणीकर यांनी नदीपात्रापासून किंवा धोकादायक ठिकाणांपासून दूर राहण्याचे आणि प्रशासनाच्या सूचनांचे पालन करण्याचे आवाहन केले आहे. तालुका आणि जिल्हा प्रशासनाचे अधिकारी आणि कर्मचारी मदत कार्यासाठी पूर्णपणे सज्ज आहेत. कोणतीही अडचण आल्यास किंवा मदतीची गरज असल्यास तत्काळ स्थानिक आपत्कालीन नियंत्रण कक्ष किंवा प्रशासनाशी किंवा थेट आमदार म्हणून माझ्याशी संपर्क साधा, असे ते म्हणाले.

**नागरिकांनी काय काळजी घ्यावी:**

नदी, नाले, ओढे यांच्याजवळ जाणे पूर्णपणे टाळावे. पुराचे पाणी घरात शिरल्यास त्वरित सुरक्षित स्थळी जावे. शक्य असल्यास घरातील इलेक्ट्रॉनिक वस्तू आणि महत्त्वाची कागदपत्रे सुरक्षित ठेवावीत. प्रशासनाकडून मिळणाऱ्या अधिकृत माहितीवरच विश्वास ठेवावा. यावेळी लोणीकर यांनी जनतेला आश्वस्त केले की, आपण परिस्थितीवर लक्ष ठेवून आहोत आणि नागरिकांच्या मदतीसाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील. नागरिकांनी एकमेकांना मदत करावी आणि या कठीण काळात एकजूट दाखवावी, असे भावनिक आवाहन देखील लोणीकरांनी यावेळी केले.

**जेवणाची व राहण्याची व्यवस्था; निवारा छावण्या उभारल्या**

मराठवाड्यासह सपूर्ण जालना जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले असून गोदावरी पी कसुरा या सर्व नद्यांना महापूर आले आहेत. भीषण पूर परिस्थितीमुळे हजारो गावकऱ्यांचे सुरक्षित स्थळी स्थलांतर करण्यात आले आहे. या स्थलांतरित पूरग्रस्तांसाठी प्रशासनाने युद्धपातळीवर तयारी करत निवारा छावण्या उभारल्या असून, तिथे त्यांच्या जेवण व राहण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. पूरग्रस्त भागातून बाहेर काढण्यात आलेल्या नागरिकांना आष्टी येथील लालबहादूर शास्त्री महाविद्यालय, इंदुबाई इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल, मोरंगेश्वर मंगल कार्यालय, जिल्हा परिषद शाळा लोणी खुर्द, व्हीजन व्हॅली इंग्लिश स्कूल कनकवाडी या ठिकाणी राहण्याची आणि जेवणाची व्यवस्था करण्यात आली आहे.या सर्व ठिकाणी १८०० हून अधिक नागरिकांनी आश्रय घेतला आहे. विशेषतः महिला, लहान मुले आणि वृद्धांसाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यावर भर देण्यात आला आहे. आमदार बबनराव लोणीकर यांनी प्रत्यक्ष या सर्व बाबींवर व्यक्तीसह लक्ष दिले आहे. शाळेतील वर्ग खोल्यांमध्ये तात्पुरती निवास व्यवस्था करण्यात आली आहे.

**जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा**

प्रत्येक व्यक्तीला ब्लँकेट, चटई, पिण्याचे पाणी, साबण आणि प्राथमिक औषधे यांचा समावेश असलेली किट तातडीने पुरवण्यात याव्यात त्याचबरोबर आरोग्याच्या समस्यांचा सामना करावा लागू नये, यासाठी जिल्हा प्रशासनाच्या मदतीने आरोग्य सुविधेची व्यवस्था केली आहे.

मागील महिनाभरापासून सातत्याने पडणाऱ्या अतिवृष्टीमुळे मराठवाड्यात सहज जालना जिल्ह्यात व विशेषता परतूर विधानसभा मतदारसंघातील गोळेगाव चांगतपुरी सावरगाव बुद्रुक यासह गोदाकांच्या सर्वच गावावर पूर परिस्थितीचे गंभीर संकट ओढवले आहे. गोदावरी नदीला आलेल्या महापुरामुळे गावातील अनेक घरांमध्ये पाणी शिरले असून, प्रशासनाने तातडीने कार्यवाही करत परिसरातील १८०० हून अधिक गावकऱ्यांना सुरक्षित स्थळी हलवले आहे. अद्यापही गोळेगाव आणि इतर ठिकाणी काही लोक गावात आहेत अद्याप त्यांनी गाव सोडलेले नाही अशा लोकांनी तात्काळ प्रशासनाला मदत करावी व तात्काळ गाव सोडून सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे असे आवाहन देखील आमदार लोणीकरांनी यावेळी केले.

**जलमय झाले गाव**

अतिवृष्टी, मुसळधार व सततच्या पावसामुळे गोदावरी नदीची पातळी धोक्याच्या खुणा ओलांडून वाहत आहे. यामुळे नदीकाठच्या आणि सखल भागातील गावात पाणी शिरले असून सकाळपर्यंत पाण्याची पातळी वाढल्याने गावकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले. अनेक कुटुंबांनी आपला जीव वाचवण्यासाठी घराच्या छतावर आसरा घेतला होता. आमदार बबनराव लोणीकर यांनी प्रशासनाला सूचनाकारताच प्रशासनाच्या मदतीने तात्काळ नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आले आहे.

**शेती आणि घरांचे मोठे नुकसान**

आमचे मुख्य लक्ष गावकऱ्यांच्या सुरक्षिततेवर आहे. जोपर्यंत पाणी ओसरत नाही, तोपर्यंत त्यांची सर्व काळजी निवारा कॅम्पमध्ये घेतली जाईल. पूर ओसरल्यावर नुकसानीचे पंचनामे तात्काळ सुरू केले जातील.असेही आमदार लोणकर यांनी स्पष्ट केले आहे. या अतिवृष्टीमुळे शेतीचे आणि मालमत्तेचे मोठे नुकसान झाले आहे. कापूस ऊस सोयाबीन उडीद मूग मका यासह खरिपाच्या पिकांचे मोठे नुकसान झाले असून, अनेक कच्च्या घरांची पडझड झाली आहे. पाणी ओसरल्यानंतर नुकसानीचा नेमका आकडा स्पष्ट होईल. पुराच्या विळख्यात अडकलेल्या सर्व गावांमध्ये बचाव आणि मदतकार्य युद्धपातळीवर सुरू आहे. असेही आमदार लोणीकर यांनी यावेळी स्पष्ट केले.

गोदाकाच्या परिसरात निर्माण झालेल्या पूर परिस्थितीमध्ये नागरिकांच्या मदतीसाठी आणि नुकसानीचा आढावा घेण्यासाठी आमदार बबनराव लोणीकर यांनी थेट बोटीने पूरग्रस्त असलेल्या सावरगाव बुद्रुक या गावाशी संपर्क साधला. जीव धोक्यात घालून लोकांपर्यंत पोहोचत असताना त्यांनी गावकऱ्यांना ’घाबरू नका, सर्वप्रथम तुमचा जीव वाचवा आणि सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्या,’ असे भावनिक आवाहन केले आहे.



**बोटीतून केली पाहणी आणि मदतकार्य**

अतिवृष्टीमुळे अनेक गावांचा संपर्क तुटला असून, सर्वत्र पाणीच पाणी झाले आहे. अशा बिकट परिस्थितीत रस्त्याने पोहोचणे शक्य नसल्याने आमदार लोणीकर यांनी प्रशासनाच्या बोटीचा वापर करत काही सर्वाधिक बाधित गावांमध्ये प्रवेश केला. पाण्याने वेढलेल्या घरांमध्ये जाऊन त्यांनी गावकऱ्यांशी संवाद साधला आणि त्यांना धीर दिला. सध्या परिस्थिती गंभीर आहे, मात्र आपण सगळे मिळून या संकटावर मात करू, असा विश्वास देखील आमदार बबनराव लोणीकर व्यक्त केला. गावकऱ्यांशी बोलताना आमदार लोणीकर यांनी स्पष्ट केले की, कोणतीही वस्तू किंवा मालमत्ता पुन्हा मिळवता येते, पण मानवी जीव अनमोल आहे.

**आमदार लोणीकर यांचे नागरिकांना आवाहन**

सर्वप्रथम तुमचा जीव वाचवा आणि कुटुंब सुरक्षित राहील याची काळजी घ्या. नदी, नाले, तलाव यांच्याजवळ थांबण्याचे धाडस करू नका. घरातील पाळीव प्राणी आणि जनावरे यांनाही सुरक्षित ठिकाणी हलवा.

प्रशासनसह आम्ही सर्व पूर्ण ताकदीने तुमच्या मदतीसाठी सज्ज आहोत त्यामुळे घाबरून न जाता प्रशासनाला सहकार्य करा. असेही गावकऱ्यांशी बोलताना स्पष्ट केले. दरम्यान, आमदार लोणीकर यांनी प्रशासकीय यंत्रणेला मदतकार्याला गती देण्याचे आणि अडकलेल्या लोकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्याचे निर्देश दिले आहेत. नागरिकांना जीवनावश्यक वस्तू, पिण्याचे पाणी आणि अन्न पुरवठा तातडीने उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात यावा असेही आमदार लोणीकर यावेळी म्हणाले.

यावेळी उपविभागीय अधिकारी डॉ. पद्माकर गायकवाड, जिल्हा कृषी अधीक्षक श्री कापसे भाजपा परतुर तालुका अधक्ष शत्रुघ्न कणसे तुकाराम सोळंके रवी सोळंके गजानन लोणीकर असेफ कच्ची अमोल पवार अमोल जोशी दादाभाऊ ढवळे अण्णासाहेब ढवळे उद्धव डोळस श्रीकृष्ण टेकाळे नामदेव टेकाळे भागवत टेकाळे रमेश थोरात छत्रपती थोरात समाधान तौर अशोक तौर सुनील तौर संतोष तौर विठ्ठल महाराज तोर योगेश तौर नवनाथ आईदे डीबी काळे राम लोणीकर तसेच प्रशासकीय अधिकारी कर्मचारी यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

## बुलढाणा काँग्रेस सेवादलाच्या शहर व जिल्हा समन्वयकपदी बाबासाहेब सोनवणे यांची नियुक्ती

**जालना । प्रतिनिधी -** अखिल भारतीय काँग्रेस सेवादलाचे राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय लालजी भाई देसाई यांच्या नेतृत्वात व महाराष्ट्र प्रदेश कांग्रेस सेवादलाचे प्रदेश अध्यक्ष आदरणीय विलास बापु औताडे यांच्या मार्गदर्शनाखाली बुलढाणा शहर व जिल्हा समन्वयक पदी बाबासाहेब सोनवणे यांची नियुक्ती प्रदेश अध्यक्ष विलास बापु औताडे यांनी केली आहे .



नियुक्ती पत्रात आपण सेवादलाचे कार्य सर्वसामान्य लोकां पर्यत पोहचवून सेवादल बळकट करण्यासाठी प्रयत्न करावे आणि अखिल भारतीय काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय खा. मल्लिकाअर्जुन खर्गे , आदरणीय खा. श्रीमती सोनियाजी गांधी यांच्या अपेक्षा प्रमाणे काँग्रेस पक्षाचे एकनिष्ठेने कार्य करावे असे नियुक्ती पत्रात नमुद केले आहे.

नियुक्ती झाल्याबद्दल सेवादलाचे प्रदेश अध्यक्ष विलास बापु औताडे , खा. कल्याणराव काळे, आ. राजेश राठोड, प्रदेश उपाध्यक्ष राजेंद्र राख, प्रदेश उपाध्यक्ष कल्याणराव दळे, जेष्ठ नेते आर. आर. खडके , जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख, सेवादल प्रदेश सचिव किसन जेठे , सेवादलाचे शहर जिल्हाध्यक्ष शेख. इब्राहीम ,

कामगारचे जिल्हा अध्यक्ष शेख. शमशुद्दीन, अल्पसंख्यांक विभागाचे जिल्हाध्यक्ष अब्दुल रफिक, सोशल मीडिया जिल्हाध्यक्ष रघुवीर गुढे , जेष्ठ नेते अशोक उबाळे, राजेंद्र गोरे, तालुका अध्यक्ष कृष्णा पडुळ, श्रीरंग कामठे आदि नेत्यांनी नियुक्ती झाल्याबद्दल बाबासाहेब सोनवणे यांचे अभिनंदन केले आहे.

## माहितीचा अधिकार दिनानिमित्त कै.सौ. कमलताई जामकर महिला महाविद्यालयात व्याख्यानमाला

**परभणी । प्रतिनिधी -** कै.सौ. कमलताई जामकर महिला महाविद्यालय, परभणी येथे सोमवार (दि २९) रोजी सकाळी १०:३० वाजता राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागातर्फे माहिती अधिकार दिनानिमित्त व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणून महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. संगीता आवचार यांनी मार्गदर्शन केले. आपल्या प्रभावी व्याख्यानात त्यांनी विद्यार्थिनींना सांगितले की माहितीचा अधिकार कायदा २००५ (RTI Act 2005) हा अष्टाक्षरी मंत्र आहे, कारण तो प्रत्येक सामान्य नागरिकासाठी सहज, सोपा आणि किफायतशीर मार्ग उपलब्ध करून देतो. कमी वेळेत आणि कमी खर्चात, पूर्णपणे कायदेशीर चौकटीत राहून नागरिक आपल्या शासनातील विविध विभागांकडून आवश्यक माहिती मागवू शकतात.

डॉ. आवचार यांनी विद्यार्थिनींना उद्देशून असेही प्रतिपादन केले की, माहितीचा अधिकार हा केवळ नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे रक्षण करणारा कायदा नाही, तर तो प्रशासनातील पारदर्शकता आणि जबाबदारी वाढविण्याचे महत्त्वाचे साधन आहे. विद्यार्थिनींनी या कायद्याचा अभ्यास करून तो व्यवहारात कसा वापरायचा हे जाणून घेतले पाहिजे. समाजातील दुर्बल घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी माहिती अधिकार हा एक सशक्त शस्त्र ठरतो. या कार्यक्रमास महाविद्यालयातील मोठ्या संख्येने विद्यार्थिनी उपस्थित होत्या. सर्वांनी व्याख्यान मन लावून ऐकले आणि माहिती अधिकार कायद्याबद्दल अनेक शंका विचारून समाधान केले.




कार्यक्रमाचे आयोजन, सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन हे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. नसीम बेगम यांनी केले. या व्याख्यानमालेमुळे विद्यार्थिनींमध्ये जागरूक नागरिक बनण्याची प्रेरणा निर्माण झाली असून, माहितीचा अधिकार हा खऱ्या अर्थाने लोकशाहीचा पाया अधिक भक्कम करणारा कायदा आहे असा संदेश या उपक्रमातून अधोरेखित झाला.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.